# पदव्यूत्तर प्रवेश प्रक्रिया शनिवारपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

- विद्यापीठ पदव्युत्तर प्रवेश समितीच्या बैठकीत निर्णय
- कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची माहिती

शिवाजी विद्यापीठातील पदव्यूतर अधिविभागाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यासंदर्भात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी पदव्युत्तर प्रवेश समितीची बैठक झाली. ही प्रवेश प्रक्रिया शनिवार ५ डिसेंबरपासून सुरू करण्यात येणार आहे. यासंदर्भात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परिपत्रक गुरुवारी (दि. ३) जाहीर करून विद्यार्थ्यांना माहिती देण्यात येईल, असा निर्णय पदव्युत्तर प्रवेश समितीच्या बैठकीत घेण्यात आला, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

पदवी अंतिम सत्राच्या परीक्षेचे निकाल जाहीर झाल्यानंतर पदव्यूतर प्रवेशपुर्व परिक्षा घेण्यात आल्या. या परीक्षेचे निकाल जाहीर झाले आहेत. या निकालासंदर्भात काही विद्यार्थ्यांना अडचणी असतील तर त्यांनी विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधावा. पदव्यूतरची प्रवेश प्रक्रिया प्रत्यक्ष अधिविभागात सुरू करण्यासंदर्भात परिपत्रक जाहीर करण्यात येणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी शासन आदेशानुसार कोरोनाच्या नियमांचे पालन करीत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन डॉ. नांदवडेकर यांनी केले. यावेळी पदव्यूतर प्रवेश समितीतील सर्व सदस्य उपस्थित होते.

**राष्ट्रीय सेवा योजनांचे शिबिर शासन आदेशानुसार**

राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे कशी घ्यायची यासंदर्भात राष्ट्रीय सेवा योजना शिक्षण संचालक कार्तिकी यांनी बैठक घेतली. या बैठकीत ऑनलाईन किंवा शासन आदेशानुसार प्रत्यक्ष शिबिर निर्णय घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रीय सेवा योजना राज्य समन्वयक आतुल साळुंखे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शिवाजी विद्यापीठ एनएसएस संचालक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात आज दिव्यांग दिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रम

**कोल्हापूर :** समावेश शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्किम फॉर पर्सन्स वूईथ डिसऑबिलिटीज, सामाजिक वंचितता व समावेश धोरण अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. ३) दुपारी १२ वाजता जागतिक दिव्यांग दिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. जळगावचे यजुवेंद्र महाजन प्रमुख पाहुणे आहेत. अध्यक्षस्थानी आंतरविद्या शाखेच्या प्रभारी अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. व्ही. गुळवणी असणार आहेत. कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन डॉ. नमिता खोत, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. जगन कराडे यांनी केले आहे.

# ‘कोरे अभियांत्रिकी’चे पाच कंपन्यांशी सामंजस्य करार

**सकाळ वृत्तसेवा**

वारणानगर, ता. २ : आंतरराष्ट्रीय सर्टिफिकेट कोर्सेस व रोजगाराच्या संधी तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यासाठी महाविद्यालयाने या वर्षी सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावरील पाच कंपन्यांशी सामंजस्य करार केला आहे. यात सिस्को सेंटर ऑफ एक्सलन्स फोर नेटवर्किंग, अमेझॉन वेब सर्विसेस सेंटर ऑफ एक्सलेन्स फोर क्लाउड कंपुटींग, ब्ल्यू प्रिजम युनिव्हर्सिटी सेंटर ऑफ एक्सलन्स आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग मायक्रोचीप सेंटर ऑफ एक्सलन्स इलेक्ट्रॉनिक सिस्टम डिझाईन ॲण्ड डेव्हलपमेंट आणि ऐजूस्किल फाऊंडेशन यांचा समावेश आहे.

कोर्सेसची फी तीस हजाराहून अधिक आहे. परंतु, महाविद्यालयात हे कोर्सेस संबंधित कंपनीकडून विद्यार्थ्यांना मोफत दिले जाणार आहेत. तसेच नोकरीच्या संधी मिळणार आहेत. कोर्सेसच्या ट्रेनिंगसाठी महाविद्यालयातील नऊ मास्टर ट्रेनर तयार केलेले आहेत. बाहेरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही याचषा लाभ घेता येईल.

वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे प्रमुख डॉ. विनय कोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांनी अभिनंदन केले. सामंजस्य करार होण्यासाठी प्राचार्य डॉ. एस. व्ही. आणेकर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्रमुख सी. पी. शिंदे, एन. बी. जाधव यांचे सहकार्य लाभले. कोर्सचे प्रमुख समन्वयक म्हणून डॉ. संतोष भोपळे काम पाहत आहेत

# डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजला स्वायत्त संस्थेचा दर्जा

## आ. ऋतुराज पाटील यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीस नवी दिल्ली युजीसी आणि शिवाजी विद्यापीठाकडून स्वायत्त संस्थेचा दर्जा (अॅटॉनोमस इन्स्टिट्यूट) मिळाला आहे. या महाविद्यालयातील चालू शैक्षणिक प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर पदवीचे प्रवेश महाराष्ट्र राज्याच्या केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेनुसार होणार असल्याची माहिती संस्थेचे विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील यांनी दिली.

आ. पाटील म्हणाले, स्वायत्त दर्जामुळे महाविद्यालयाने स्वत:चा स्वतंत्र अभ्यासक्रम, परीक्षा पद्धत, गुणांकन पद्धत विकसित केली आहे. विद्यार्थ्यांना उद्योजकीय अनुभव मिळावा, यासाठी ५० पेक्षा जास्त उद्योजकांसोबत सामंजस्य करार केला आहे. विद्यार्थ्यांना २ ते ४ महिने उद्योगामध्ये इंटर्नशिप करण्याची संधी मिळेल. स्टुडन्ट एक्स्चेंज सुविधेंतर्गत देशातील व राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये एक सत्र शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळेल. त्यासाठी चार नामांकित संस्थांबरोबर सामंजस्य करार केले आहेत.

कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता म्हणाले, आर्किटेक्चर पदवी अभ्यासक्रमाला स्वायत्त संस्थेचा अभ्यासक्रमाचा दर्जा मिळवणारे हे राज्यातील पहिले महाविद्यालय ठरले आहे. प्रत्येकी ६० प्रवेश क्षमता असलेले बी. ई. कॉम्प्युटर सायन्स विथ स्पेशलायझेशन इन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड मशिन लर्निंग व बी. ई. कॉम्प्युटर सायन्स विथ स्पेशलायझेशन इन डेटा सायन्स या दोन नव्या अभ्यासक्रमांसह अनेक प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्याचे आ. पाटील यांनी सांगितले